व्याख्या: समावेशन : देशाच्या आर्थिक वृद्धीच्या फायद्यापासून वंचित राहिलेल्यांना विकासाच्या प्रक्रियेत सामावून घेण्यासाठी केलेले प्रयत्न म्हणजे समावेशन.

प्रमुख ३ प्रकार : ① आर्थिक समावेशन
② वित्तिय समावेशन
③ सामाजिक समावेशन.

1) आर्थिक समावेशन : ⇒ उत्पन्न वाढीचे फायदे सर्वांना मिळणे.
⇒ वृद्धी प्रक्रियेत सर्वांना सामावून घेणाऱ्या वृद्धीला समावेशी वृद्धी म्हणतात
⇒ समावेशी वृद्धीची संकल्पना ⇒ प्रथम ११ व्या योजनेत.
११ वी योजना ⇒ वेगवान व अधिक समावेशी वृद्धी.
१२ वी योजना ⇒ वेगवान, शाश्वत व अधिक समावेशी वृद्धी.

2) वित्तीय समावेशन = वित्तिय समावेशन म्हणजे देशातील वंचित व अल्प उत्पन्न गटातील जनतेला कमी खर्चात बँकिंग सेवा उपलब्ध करून देणे.

सद्यस्थिती ⇒ i) सरकार व RBI चे प्रयत्न.
ii) बँकांचे राष्ट्रीयीकरण, शाखा विस्तार, सहकारी संस्था, प्रादेशिक ग्रामीण बँका, कर्जपुरवठा, अग्रणी बँक योजना, SHGs इ.
iii) 2005-06 RBI कडून नो फ्रिल खात्याची सुविधा.
नो फ्रिल खाते: शून्य किंवा अत्यल्प बॅलेंस चालतो. खाते वापरण्याचे शुल्क अत्यल्प.
iv) 2011- जनगणनेनुसार देशातील २४.६७ कोटी कुटुंबांपैकी १४.४८ कोटी कुटुंबांना (५८%) बँकिंग सेवा उपलब्ध (ग्रामीण ५४%, शहरी ६८%)

SHG - बँक लिंकेज प्रोग्राम : -
* नाबार्डचा सूक्ष्म वित्त पुरवठ्याचा जगातील सर्वात मोठा कार्यक्रम
* बचत गटांना व्यापारी, सहकारी, प्रादेशिक बँकांत खाते व अल्पव्याजदरात कर्जपुरवठा.

किसान क्रेडिट कार्ड : शेतकऱ्यांसाठी कॅश क्रेडिट पद्धतीने कर्ज देण्याची योजना.

बँक साथी / बिझिनेस करस्पॉन्डंट योजना : २००६ मध्ये व्यापारी बँकांसाठी योजना. हे बँक साथी दुर्गम भागातील व्यक्तीपर्यंत पोहोचून त्यांचे नो फ्रिल खाते उघडतात व वेळोवेळी भेट देवून पैसे टाकणे, काढणे, हस्तांतरीत करणे या सेवा देतात. त्यासाठी POT मशीनचा

Scanned by CamScanner

पॉईन्ट ऑफ ट्रान्झॅक्शनचा - ते एक हॅण्ड हेल्ड मशीन असते.

स्वाभिमान - २०११ - २००० पेक्षा अधिक लोकसंख्येच्या ७४००० गावांना बँक सेवा

## प्रधानमंत्री जनधन योजना

घोषणा : १५ ऑ.२०१४ - सुरुवात - २८ ऑगस्ट २०१४

योजना एक राष्ट्रीय वित्तिय समावेशन अभियान आहे.

उद्दिष्ट्ये : ६ आधार : पहिल्या ६ वर्षांत पहिल्या ३ आधारावर भर.

① बँक सेवांची सार्वत्रिक उपलब्धता : सर्व जिल्ह्यांचे विभाजन १०००-१५०० कुटुंबे छोट्या उप-सेवा क्षेत्रामध्ये करून १४ ऑ २०१५ पर्यंत ५ किमीच्या आत बँक सेवा.

② सर्व कुटुंबांना मुलभूत बँक खाते, ओव्हरड्राफ्ट सुविधा, डेबिट कार्ड उपलब्ध.

③ वित्तिय साक्षरता कार्यक्रम - वित्तिय सेवांची माहिती

④ पतहमी निधी (Credit Guarantee fund) -

⑤ सुक्ष्म विमा : १४ ऑ. २०१८ पर्यंत सर्व इच्छुक व योग्य व्यक्तींना

⑥ असंघटित क्षेत्रासाठी पेंशन योजना : १४ ऑ २०१८ पर्यंत.

## * वित्तिय समावेशन योजनेचा कालावधी -

१४ ऑ.२०१८ पर्यंत २ टप्प्यांत.

टप्पा १ ⟹ १५ ऑ.२०१४ ते १४ ऑ.२०१५

i) सर्व प्रदेशांना सार्वत्रिक बँक सेवा.

ii) मुलभूत खाते व रुपे कार्ड

iii) वित्तिय साक्षरता.

टप्पा २ ⟹ १५ ऑ २०१५ ते १४ ऑ.२०१८

i) ६ महिने समाधानकारक रित्या खाते चालवल्यानंतर ५००० रु. OD.

ii) पत हमी निधी निर्माण करणे.

iii) सुक्ष्म विमा व स्वावलंबन.

जनधन :

योजनेची वैशिष्ट्ये ⟹ i) स्वाभिमान पेक्षा वेगळी (स्वा - २००० + लोकसंख्या - जनधन १००० ते १५०० कुटुंबे - ५ km) उ

ii) कोणत्याही बँकेत खाते.

iii) मुलभूत बचत बँक ठेव खाते (Basic Saving Bank Depos

- किमान बॅलन्सची आवश्यकता नाही.

iv) प्रत्येक खातेदाराला Rupay डेबिट कार्ड.

v) रुपे कार्ड धारकास कोणत्याही शुल्काविना एक लाख रुपयापर्यंत

अपघात विम्याचे कव्हर : (परंतु विम्याची सुविधा मिळण्यासाठी रुपे कार्ड ४५ दिवसातून एकदा वापरणे बंधनकारक)

vii) २५ जाने २०१५ पूर्वी खाते उघडणाऱ्यास ३०,००० रुपयांचे जीवन बीमा कव्हर

viii) DBT स पात्र (प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण)

ix) खात्यावरील ठेवीवर ४% व्याज व ओव्हरड्राफ्ट कर्जावर १२% व्याज आकारले जाईल.

योजनेची प्रगती दिनांक - 29/08/2018

⇒ जनधन खात्यांची संख्या - ३२.५४ कोटी (१९.२१ कोटी ग्रामीण तर १३.३३ शहरी)
( पब्लीक सेक्टर बँक - ~~[illegible]~~ २६.२६, प्रादेशिक ग्रामीण बँक ५.२८ तर खाजगी - १ कोटी )

⇒ वाटण्यात आलेले रुपे कार्डची संख्या - २४.५१ कोटी

⇒ खात्यांमधील बॅलन्स = ८२०३९.३५ कोटी.

महाराष्ट्र :

जनधन खात्यांची संख्या - १ कोटी १० लाख ग्रामीण } २ कोटी २६ लाख एकूण
१ कोटी १६ लाख शहरी

खात्यामधील बॅलन्स = ४६९९.९ कोटी

रुपे कार्ड वाटप = १ कोटी साठ लाख.

## सामाजिक सुरक्षा योजना

९ मे २०१५ रोजी ३ योजनांची घोषणा :

१) प्रधानमंत्री सुरक्षा बीमा योजना : (PMSBY)
⇒ अपघाती मृत्यू व अपंगत्वासाठी विमा.
⇒ वयोगट १८ ते ७० - आंशिक व पूर्ण अपंगत्वासाठी २ लाख रु.चे कव्हर
⇒ प्रिमियम १२ रु./ग्राहक/वर्ष — दरवर्षी नव्याने घेता येऊ शकेल.

प्रधानमंत्री जीवनज्योती विमा योजना : (PMJJBY)
⇒ जीवन विमा योजना - कोणत्याही कारणामुळे झालेल्या मृत्यूसाठी.
⇒ १८ ते ५० वयोगट — २ लाख रु विमा कव्हर.
⇒ प्रिमियम - ३३० रु/ग्राहक/वर्ष — दरवर्षी नव्याने घेणे शक्य.

अटल पेन्शन योजना : (APY)
⇒ १८ ते ४० वयोगटातील असंघटित क्षेत्रातील व्यक्तींसाठी पेन्शनची योजना.
⇒ भरावयाच्या रकमेच्या आधारावर वयाच्या ६० व्या वर्षी रु १०००/२०००/३०००/४०००/५००० इतके निश्चित किमान पेन्शन दर महिन्याला प्राप्त होईल.
⇒ योजनेने २०१०-११ साली सुरु झालेल्या स्वावलंबन योजनेची जागा घेतली.

Scanned by CamScanner

३) सामाजिक समावेशन / सामाजिक क्षेत्र पुढाकार -

सामाजिक - आर्थिकदृष्ट्या वंचित गटांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केलेले प्रयत्न.

① दारिद्र्य निर्मूलन ② रोजगार निर्मिती ③ सामा. सुरक्षा योजना ④ पेयजल ⑤ स्वच्छता ⑥ गृहनिर्माण ⑦ शिक्षण ⑧ आरोग्य ⑨ महिला व बालविकास

# घटक - भारतीय व्यापारी बँक व्यवसाय

## भारतीय वित्तीय व्यवस्था :

⇒ वित्त म्हणजे कर्जाने दिला घेतला जाणारा पैसा.

⇒ वित्ताची गरज व्यक्ती, कुटुंबे, व्यापारी, व्यावसायिक, उद्योगपती, शेतकरी विविध सरकारे यांना.

**विभाग : ४**
- i) वित्तीय बाजार
- ii) वित्तीय संस्था
- iii) वित्तीय सेवा
- iv) वित्तीय साधने.

* वित्तीय बाजार - वित्ताच्या देवाणघेवाणीचा बाजार.

कालावधीनुसार दोन भाग : अ) नाणे बाजार ब) भांडवल बाजार
- अ) नाणे बाजार → अल्पकालीन वित्त
- ब) भांडवल बाजार → मध्यमकालीन व दीर्घकालीन

या दोन्ही बाजाराचे विभाजन अ) प्राथमिक बाजार - ब) द्वितीय बाजार
- अ) प्राथमिक बाजार → प्रथम निर्माण होणारी पतसाधने
- ब) द्वितीय बाजार → विद्यमान पतसाधनांची देवाणघेवाण.

**भारतीय वित्तीय बाजार**
- भारतीय नाणे बाजार
  - असंघटित क्षेत्र
    - सावकार
    - सराफी पेढीवाले
  - संघटित क्षेत्र
    - व्यापारी बँक व्यवसाय.
- भारतीय भांडवल बाजार
  - व्यापारी बँका
  - विकास वित्तीय संस्था
  - विमा कंपन्या
  - मर्चंट बँका
  - म्युच्युअल फंड्स

Scanned by CamScanner